# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

### विद्याशाखा परिषद बैठक - इतिवृत्त

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषदेची सभा गुरूवार दि. 17.10.2019 रोजी दुपारी 1.00 वाजता विद्याशाखा सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकिस खालील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. मा. डॉ. पंडित पलांडे, संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | अध्यक्ष |
| 2. डॉ. राजश्री शिंदे, पुणे, | सदस्य |
| 3. डॉ. महेश कुलकर्णी, नाशिक | सदस्य |
| 4. डॉ. आर एन नायर, डोंबिवली | सदस्य |
| 4. डॉ. सुरेंद्र पाटोळे, सहा. प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 5. डॉ. उमेश राजदेरकर, संचालक, मानव्यविद्या व सामाजीकशास्त्रे विद्याशाखा | सदस्य |
| 5. डॉ. प्रमोद खंदारे, प्र संचालक, संगणक विद्याशाखा | सदस्य |
| 6. डॉ. कविता साळुंके,प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 6. डॉ. जयदिप निकम, संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 5. डॉ. लतिका गायकवाड, सहा प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |

डॉ. व्ही.एम. चव्हाण, कोल्हापूर, हे सदस्य काही अपरिहार्य कारणांमुळे सभेस उपस्थित राहू शकले नाहीत.सभेच्या सुरवातीस विद्याशाखा परिषद अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले. सदर बैठकीत पुढील विषयांवर चर्चा होऊन सर्वानुमते निर्णय घेण्यात आले.

| विषय क्र | विषय पत्रिका/तपशिल |
|---|---|
| वाणिज्य/2019 4.1 ठराव | दि. 10 मे 2019 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे. दि. 10 मे 2019 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| वाणिज्य/2019 4.2 ठराव | मा. कुलगुरूंनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार विद्याशाखेअंतर्गत BBA General नविन शिक्षणक्रम सुरु करण्यासंदर्भात विषय विचारार्थ सादर. शैक्षणिक वर्ष 2020-21 पासून वाणिज्य व व्यवस्थान विद्याशाखेअंतर्गत बीबीए हा नविन शिक्षणक्रम सुरू करावा अशी मा. कुलगुरूंनी इच्छा व्यक्त केली होती, त्यानुसार शैक्षणिक वर्ष 2020-21 पासून विद्याशाखेत बीबीए हा नविन शिक्षणक्रम सुरु करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. |
| वाणिज्य/2019 4.3 ठराव | विद्याशाखेअंतर्गत BBA General शिक्षणक्रम सुरू करण्यासाठी सदर शिक्षणक्रमाच्या संदर्भात विविध निर्णय घेण्यासाठी राज्यस्तरीय सल्लागार समिति (पी ए सी-प्रोग्राम ॲडव्हायजरी कमीटी) नियुक्त करणेबाबत विषय सविनय सादर. शैक्षणिक वर्ष 2020-21 पासून वाणिज्य व व्यवस्थान विद्याशाखेअंतर्गत बीबीए हा नविन शिक्षणक्रम सुरू करण्यात यावा असे ठरल्यानंतर सदर शिक्षणक्रमासंदर्भात विविध निर्णय घेण्यासाठी तज्ञ व्यक्तींची एक राज्यस्तरीय सल्लागार समिती (पी ए सी-प्रोग्राम ॲडव्हायजरी कमीटी) स्थापन करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. सदर समितीवर तज्ञ व्यक्तींची नियुक्ती करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, विद्याशाखा परिषद यांना देण्यात आले. |
| वाणिज्य/2019 4.4 | विद्याशाखेअंतर्गत चालणाऱ्या BBA(Aviation/ Hosopitlity/Travel & Tourism management-P90) या शिक्षणक्रमाच्या प्रकल्प अहवालाचे मुल्यमापन विद्यापीठात |

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक.
आवक क्र. : VC/370
दि. 19/12/2019

| | |
|---|---|
| | करणेबाबत विषय सविनय सादर |
| ठराव | विद्याशाखेअंतर्गत चालणा-या BBA(Aviation/ Hosopitlity/Travel & Tourism management-P90) या शिक्षणक्रमाच्या प्रकल्पा अहवालाचे मुल्यमापन वाणिज्य व व्यववस्थान विद्याशाखेतून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदर प्रकल्प अहवाल मुल्यमापनाचे मानधन विद्याशाखेतूनच तज्ज्ञ व्यक्तींना करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले |
| वाणिज्य/2019 4.5 | शैक्षणिक वर्ष 2020-21 साठी विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रामाच्या नविन अभ्यासकेंद्र देणेबाबत तसेच त्याचे नियमावलीस मान्यता देणे बाबत... <br> टिपणी- सन 2019-20 या शैक्षणिक वर्षात विद्याशाखेने कुठलेही नविन अभ्यासकेंद्र दिलेले नव्हते. त्यामुळे शैक्षणिक वर्ष 2020-21 करीता संबध महाराष्ट्रातून नविन अभ्यासकेंद्रासाठी विचारणा होत आहे. विद्यार्थी संख्या वाढविण्याच्या दृष्टीने नविन अभ्यासकेंद्र देणे गरजेचे आहे. सबब सदर विषय विचारार्थ सविनय सादर.. |
| ठराव | शैक्षणिक वर्ष 2020-21 करीता विद्याशाखेअतर्गत राबविण्यात येणा-या सर्व शिक्षणक्रमाची विद्यार्थीसंख्या वाढविण्याच्या दृष्टिने नविन अभ्यासकेंद्र द्यावे असे सर्वानुमते ठरले. तसेच सर्व शिक्षणक्रमांच्या नविन अभ्यासकेंद्र देण्याच्या नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| वाणिज्य/2019 4.6 | विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांच्या सध्या कार्यरत असलेल्या अभ्यासकेंद्रांचा तज्ज्ञ पहाणी समितीकडून आढावा घेण्यासाठी विषय विचारार्थ सादर.. |
| ठराव | विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांच्या सध्या कार्यरत असलेल्या अभ्यासकेंद्रांचा तज्ज्ञ पहाणी समितीकडून आढावा घ्यावा असे सर्वानुमते ठरले. सदर समितीवर तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष, विद्याशाखा परिषद यांना देण्यात आले. |

सभेच्या शेवटी मा. अध्यक्षांनी सर्वांचे आभार मानले व सभा संपली असे जाहिर केले.

संचालक,
वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

मा. कुलगुरू यांना इतिवृत्त मान्यतेसाठी सविनय सादर